दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१२४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## गंगेत डुबकी मारली तरी गद्दारीचा डाग पुसला जाणार नाही

**मुंबई–**मराठी भाषा दिनानिमित्त शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाषण केले. स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ आयोजित 'मराठी भाषा दिवस' या कार्यक्रमात बोलताना उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणातून एकनाथ शिंदे यांच्यावर तसेच पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली आहे.आता उद्या पेपरमध्ये येणार हिंदुत्व सोडले. हिंदुत्व म्हणजे काही धोतर नाही. शिवसेनाप्रमुखांनी आपल्याला एक घोषवाक्य दिले होते गर्व से कहो हम हिंदू हे. आता अभिमानाने म्हणा आम्ही मराठी आहोत. शिवसेनेने महाराष्ट्रातल्या मराठी माणसांसाठी कार्य केले. मी म्हणेल की आपण स्वच्छ मराठी भाषेत आपण व्हॉट्सअपवर बोलले पाहिजे.हा मराठी दिवस साजरा करताना आपण उत्सवासारखा साजरा केला पाहिजे. गद्दारी करून आपले सरकार पाडल्यानंतर आम्हाला मराठी नाही येत असे आपल्या घरात ऐकायला मिळाले. मराठी साहित्य संमेलन झाले ते खरेच साहित्य संमेलन होते की आणखी काही माहीत नाही. भवाळकर यांनी जे भाषण केले ते दिशा देणारे भाषण होते. त्यांनी जे मुद्दे मांडले त्यावर विचार व्हायला पाहिजे. मी जैविक नाही असे म्हणणाऱ्यावर खरेच किती विश्वास ठेवायचा यावर चर्चा व्हायला पाहिजे, देशभर चर्चा व्हायला पाहिजे, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींना टोला लगावला.

### मुख्यमंत्र्यांनी घेतला १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा

# बैठकीला सचिवांसह ६८५४ अधिकारी उपस्थित राहत केला विक्रम, १५ अधिकाऱ्यांना प्रमाणपत्रे

**मुंबई (वृत्तसंस्था):** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा अंतरिम आढावा घेण्यात आला. ७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या कालावधीत जी कामे झाली आहेत त्यासंदर्भात आजच्या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत एक विक्रम देखील झाला आहे.या बैठकीला मंत्रालय सचिवांपासून ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांपर्यंत ६८५४ अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रम, तालुका स्तरापर्यंत अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना काही



महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.अधिकाऱ्यांना सूचना देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, नावीन्यपूर्ण उपक्रमांची यादी तयार करा, त्या इतरांनाही सांगा. गुंतवणूक येत असताना गुड गव्हरनन्स द्या, संकेतस्थळे फुलप्रूफ करा. संपूर्ण कालावधीचा आढावा आल्यानंतर १ मे रोजी याचा सार्वजनिक कार्यक्रम करू असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. तसेच यावेळी चांगली कामगिरी करणाऱ्या १५ अधिकाऱ्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर फडणवीस यांनी प्रत्येक खात्याला १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. या आराखड्यात लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजना, राज्याचे पुढारलेपण कायम ठेवत प्रगतीच्या शिखरावर नेणाऱ्या कामगिरीचा समावेश असावा, असे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढील १०० दिवसांच्या आराखड्यातून विभागांनी ठोस कामगिरी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच सरकारी योजनांची योग्य अंमलबजावणी करावी, अशा सूचना देखील फडणवीस यांनी या बैठकीत दिल्या आहेत.

## आदर्श शिक्षक शामराव थोरात गुरुजींच्या जीवन कार्यावर गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे मांगवडगाव येथील रहिवाशी असणारे शामराव थोरात गुरुजी हे समाजासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे योगदान विशेषतः ग्रामीण शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय राहिले आहे.त्यांनी नालंदा शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाच्या प्रसारासाठी काम केले आणि अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने त्यांनी कार्यरत राहून समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांचे



मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला. राजकीय स्तरावरही त्यांनी समाजहितासाठी योगदान दिले.अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या जीवनकार्यावर गौरव ग्रंथ प्रकाशित होत असेल, तर ते एक महत्त्वाचे दस्तऐवजीकरण ठरेल.

या बाबत सविस्तर माहिती अशी कि कालकथित शामराव थोरात गुरुजी यांच्या जीवनावर प्रकाश टाळण्यासाठी गौरव समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक मुजमुले सचिव डॉ. ओमप्रकाश नायर व ड सचिन थोरात यांनी पुढाकार घेऊन गौरव ग्रंथ प्रकाशीत करण्याचे ठरवले आहे . दिनांक २ मार्च २०२५ वार रविवार रोजी फुलेनगर येथील जे.के. फंक्शन हॉल येथे हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार असून सदरील प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकाकुन करण्यात आले आहे.

## रमजानपूर्वी बीड शहराची स्वच्छता करा-शेख इमरोज शरीफ

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात दिवसेंदिवस कचऱ्याचे प्रमाण वाढत चालले आहे, आणि दुर्दैवाने प्रशासनाकडून त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. शहरातील अनेक वॉर्ड आणि प्रभागांमध्ये रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत आहेत. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.



रमजानच्या पवित्र महिन्याला सुरुवात होण्याआधीच संपूर्ण शहराची, विशेषतः मुस्लिम बहुल भागांची स्वच्छता करण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी आहे. धार्मिकदृष्ट्या हा महिना स्वच्छता आणि पवित्रतेसाठी महत्त्वाचा मानला जातो, मात्र अशा परिस्थितीत जर कचऱ्याचा प्रश्न सोडवला गेला नाही, तर आरोग्यासह धार्मिक कार्यांवरही परिणाम होऊ शकतो.कचऱ्याचे ढीग म्हणजे साथीच्या रोगांचे आणि दुर्गंधीचे माहेरघर बनले आहे. नागरिकांना शुद्ध हवा मिळणे कठीण झाले आहे. रमजानच्या आधी शहराची स्वच्छता झाली पाहिजे, असे मत स्वतंत्र पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी व्यक्त केले.प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि रमजानच्या आधी शहरात स्वच्छतेचे काम पूर्ण करावे, अन्यथा याबाबत लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन उभे करण्यात येईल असा इशारा देखील पत्रकाद्वारे दिला आहे .

## आनंदगाव येथे शिवजन्मोत्सव साजरा



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथे शिवजन्मोत्सव उत्सव साजरा करण्यात आला पारंपारिक वेशभूषा लेझीम पथक आदी परंपारिक वाद्यांमध्ये मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ज्येष्ठ नागरिकांनी दांडपट्टा फिरवणे ,लेझीम आदी खेळांमधून सकारात्मक संदेश दिला. २३ व २४ फेब्रुवारी या दोन दिवसीय महोत्सवामध्ये प्रथम दिवशी व्याख्याते अमोल तौर यांचे व्याख्यान झाले.यावेळी पन्नास हुन अधिक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर भाषणे केली. कार्यक्रमास गावातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## अमली पदार्थांचे सेवन म्हणजे कॅन्सर व इतर रोगांना आमंत्रण-तत्वशिल कांबळे



**बीड । प्रतिनिधी**

नेहरू युवा केंद्र बीड,राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड, नशाबंदी मंडळ बीड व समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थ सेवनमुक्ती जनजागृती अभियानांतर्गत शासकीय तंत्रनिकेतन बीड या ठिकाणी आज दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एम आर लोहकरे,अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड , तत्वशील कांबळे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड, सी एस गुरव,प्रा. दत्ता करवार, प्रा. विकास ढोकणे,प्रा. एस क्यू.सय्यद प्रा. सचिन देशमुख, प्रा. विवेक दुबाले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना कांबळे म्हणाले कि अमली पदार्थाचे सेवन हे आरोग्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात हानिकारक आहे अमली पदार्थ चे सेवन एकदा केल्यानंतर परत परत करण्याची शरीराला सवय लागते व ती सवय खूप मोठ्या व्यसनाच्या प्रमाणात बदलते त्यामुळे स्वतःच्या कुटुंबाचा शरीराचा ऱ्हास होतो विविध आजार उद्भवू लागतात कॅन्सर सारख्या आजारांनाही आपण यामुळे आमंत्रण देत आहोत असे मार्गदर्शन यावेळी तत्त्वशील कांबळे यांनी केले.

यावेळी बोलताना तांगडे म्हणाले की आजची युवा पिढी अमली पदार्थ सोबतच मोबाईलच्या व्यसनामध्ये जखडली जात आहे व लहान बालके ही मोबाईलच्या व्यसनात अडकली जात आहेत पालकांनी वेळीच लक्ष देऊन युवकांना व बालकांना या व्यसनाचे दुष्परिणाम समजावून सांगणे खूप गरजेचे आहे अन्यथा आपल्या बालकाला यातून बाहेर काढणे खूपच जिकरीचे होऊ शकते या व्यसनामुळे काही युवक गुन्हेगारी क्षेत्राकडेही वळू लागले आहेत या सर्वांना वेळीच आवर घालणे खूप गरजेचे आहे असे मनोगत अशोक तांगडे यांनी व्यक्त केले यावेळी व्यसनमुक्तीच्या पोस्टरचेही प्रदर्शन भरवण्यात आले होते.

## गंगापूर येथे मराठी भाषा दिवस उत्साहात साजरा



**छ.संभाजीनगर । प्रा. संजय तुपे**

२७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाकवी कुसुमाग्रज यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिवस मॉडर्न इंटरनॅशनल स्कूल (सीबीएसई), गंगापूर येथे पारंपरिक थाटात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या संचालिका श्रीमती बिंदू विश्वंभरम मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका श्रीमती कविता गवते आणि समन्वयक प्रा. संजय तुपे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपाली कानडे यांनी तर आभार प्रदर्शन वैशाली पवार यांनी केले.

विद्यार्थ्यांचे बहारदार सादरीकरण या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक वेशभूषांमधून मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले.णवासुदेवाची भूमिका - मुकुंद पवारणसंत ज्ञानेश्वर विचारमंच - वेदांत ढवळेणसंत तुकाराम महाराज - कैवल्य जाधवणवारकरी सादरीकरण - श्रीहर्ष मनाणमुक्ताबाई विचारमंच - ओवी राजळेणकुसुमाग्रज यांची 'कणा' कविता - अर्णव हिवाळेणपु. ल. देशपांडे यांच्या साहित्यावर सादरीकरण - अर्जुन जगदाळे.विंदा करंदीकर यांच्या कविता सादर - समर्थ पाटील, तसेच, इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी भारूड नृत्य सादर करून पारंपरिक लोककलेचा जागर केला, तर इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी 'एकी' या विषयावर नाट्य सादर केले. 'मी अभिमानाने मराठी' या विषयावर मुलींनी प्रभावी सादरीकरण सादर केले. आदिती जाधव आणि त्रिशा गलांडे यांनी प्रेरणादायी भाषणे दिली. मराठी साहित्याचा गौरव आणि प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. संजय तुपे यांनी मराठी भाषा, साहित्य, चित्रपट, गीतकार आणि कवितांचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. महाकवी कुसुमाग्रज यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र राज्य गीत व राष्ट्रगीताच्या सामूहिक गायनाने झाली. विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद आणि संपूर्ण शाळा परिवाराने या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. मराठी संस्कृतीचा वारसा जपण्याचा आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

## नामदेव (तात्या) मुंडे यांचे वृध्दप काळाने निधन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील देवगाव येथील रहिवाशी तथा जेष्ठ नागरिक नामदेव गणपती मुंडे वय ९० वर्षे याचं बुधवार दि.२६ फेब्रुवारी रोजी दुपारी साडे तीनच्या



सुमारास वृध्दप काळाने निधन झाले आहे. नामदेव तात्या हे देवगांव परिसरात नामदेव तात्या या नावाने सर्वांच्या परिचयाचे होते.गुरुवारी सकाळी त्यांच्यावरअंतीम संस्कार करण्यात आले.नामदेव तात्या यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली,तीन मुले,सूना, नातवंडे व नातेवाईक अशा मोठा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते बंडूचिचा मुंडे यांचे ते वडील होते.

संपादकीय

# घ्या जरा जलधडा...

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी या सात धरणांची पाणीसाठवण क्षमता १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर आहे. त्यांतून रोज तीन हजार ८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मुंबईची लोकसंख्या पाहता मुंबईची दैनंदिन पाण्याची गरज ही ४ हजार २०० दशलक्ष लिटर आहे. मात्र सध्या सात धरणांतून होणारा पाणीपुरवठा हा तीन हजार ८५० दशलक्ष लिटर आहे. त्यातही २५ ते ३० टक्के पाण्याची चोरी होणे, पाणी गळती हे होतच असते. काही वेळा विविध विकासकामांमुळे जलवाहिन्यांचे नुकसान होऊन बरेच पाणी वाया जाते. मात्र या पाण्याची किंमतही अनेकांना नाही. उन्हाळा आला की धरणांतील पाणीसाठा नजरेसमोर येतो आणि त्यानंतर पाण्याचे खरे मोल समजते. मुंबईला पाणी पुरवठा होत असतानाच जलवाहिन्यांमधून होणारी पाणीगळती हा महत्त्वाचा मुद्दा असून यातील ३० टक्के पाणी वाचवण्यासाठी मुंबई महापालिकेने प्रयत्न करायला हवेत. जलवाहिन्यांलगत असलेल्या झोपड्या, चाळींतून होणारी पाणीचोरी, भूमिगत किंवा रस्त्याला समांतर अशा जलवाहिन्यांमधून होणारी गळती आणि त्यांची सुरक्षा असे अनेक मुद्दे समोर येतात. या मुद्यांकडे आवर्जून लक्ष देणे गरजेचे आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांपैकी विहार आणि तुळशी वगळता अन्य धरणे ही मुंबईच्या हद्दीबाहेरच आहेत. तिथून सुमारे सव्वाशे ते दीडशे किमी अंतरावरून विविध जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा होतो. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या या जलवाहिन्यांचे बाह्य विभागामध्ये सुमारे ३८० किलीमीटर अंतराचे अतिशय मोठे जाळे आहे. या जलवाहिन्या जंगल परिसर, दुर्गम भागातून मुंबईच्या दिशेने अंथरलेल्या आहेत. तसेच बहुतांश अंतरात त्या जमिनीखालीही आहेत. त्यामुळे पाणीगळती किंवा पाणीचोरी रोखण्यासाठी या जलवाहिन्यांची सुरक्षा आणि त्यांची देखभाल ही महत्त्वाची आहे. जलवाहिन्यांवर माती, गाळ, दमट हवामान, कचरा आणि इतर रसायने यांचा प्रतिकूल परिणाम होत असतो. त्यामुळे जलवाहिन्यांवर गंजदेखील चढतो. मोठ्या जलवाहिन्यांना जोडूनच पाणी वितरणासाठी अन्य जलवाहिन्याही जोडलेल्या असतात. त्यातूनही पाण्याची गळती होत असते. ५० ते १०० वर्षे आणि त्यापेक्षाही जुन्या असलेल्या जलवाहिन्या बदलून त्याऐवजी नवीन जलवाहिन्या टाकणे आणि जलवाहिन्यांचे मजबूतीकरण हा पर्याय आहे आणि तो मुंबई महापालिकेने निवडलाही आहे. त्याचे नियोजन होत असले तरीही प्रत्यक्षात मात्र दिसून आलेले नाही. मुंबईत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा फटका जलवाहिन्यांना बसतो आणि गळती लागून पाणी वाया जाते. पाणीगळती, पाणीचोरी तसेच विविध विकासकामांमुळे जलवाहिन्या फुटणे याबाबतच्या २०२२ आणि २०२३ मध्ये ५५ हजारपेक्षा जास्त तक्रारी मुंबईकरांनी केल्या आहेत. त्या सोडवण्यातही आल्या. मात्र हे प्रमाण पाहता जलवाहिन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतोच.मुंबईत मोठ्या प्रमाणात होणारी पाण्याची नासाडी थांबवल्यास ऐन उन्हाळ्यात हेच पाणी उपयोगी पडेल. त्यामुळे विनाअडथळा सुरक्षितरीत्या पाणीपुरवठा व्हावा, यासाठी जलबोगद्याचा पर्याय मुंबई महापालिकेने निवडला आहे. मुंबईत घाटकोपर ते परळ ११० किमी जलबोगद्याचे काम हाती घेतानाच पिसे पांजरापोळ जलशुद्धीकरण केंद्र ते मुलुंडपर्यंत २१ किमीचा जलबोगदाही तयार केला जाणार आहे.पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी समुद्राचे खारे पाणी गोडे करण्यासाठी मनोरी येथे नि:क्षारीकरण प्रकल्प, पाणीसाठा वाढवण्यासाठी गारगाई, पिंजाळ, दमणगंगा पिंजाळ नवीन धरण आणि सांडपाण्यावर तीन स्तरावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर हे प्रकल्प मुंबई महापालिकेने हाती घेतले. मात्र, गेली बरीच वर्षे विविध कारणांमुळे ते पूर्णत्वास जाऊ शकलेले नाहीत. स्वप्नवत असलेले हे प्रकल्प कधी पूर्ण होतील, हेदेखील माहिती नाही. त्यामुळे वाढती लोकसंख्या, पाण्याची गरज आणि उन्हाळा जवळ आल्यावर जाणवणारी पाणीटंचाई पाहता तातडीचे उपाय आधीच शोधणे गरजेचे आहे. यासाठी मुंबईकरांमध्ये पाणी बचतीसाठी वर्षभर जनजागृती झालीच पाहिजे. रहिवासी संकुल, शासकीय संस्था, हॉटेल, कारखाने, छोटे-मोठे उद्योग यांत ही जनजागृती रुजायलाच हवी. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांतील पाणीसाठा दहा टक्क्यांच्या खाली जातो आणि पाणीटंचाईचे सावट मुंबईवर दाटू लागते. पाण्याची वाढती मागणी आणि वाढलेल्या उन्हामुळे पाण्याचे होणारे बाष्पीभवन यामुळे धरणांतील पाणी तळ गाठते, असे महापालिका अधिकारी सांगतात. मात्र नुकत्याच एका आकडेवारीतून राज्यातील मोठ्या, मध्यम आणि लघुसिंचन प्रकल्पातून दरवर्षी १६५ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याची माहिती राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाच्या पाणी लेखापरीक्षण अहवालातून समोर आली. यातून मुंबईलाही तीन वर्षे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल, एवढ्या प्रमाणात पाण्याची वाफ होत असल्याचे स्पष्ट झाले. मग या पर्यायाचा मुंबई महापालिकेकडून विचार का होताना दिसत नाही, हा प्रश्नच आहे. धरणातून विसर्ग होणाऱ्या पाण्याचा योग्यरीतीने वापर करण्याचा पर्यायही आहे. या पर्यायाचाही मुंबई महापालिकेकडून विचार होत असून विहार धरणातून विसर्ग करण्यात येणाऱ्या पाण्याचा योग्य रीतीने वापर करण्यासाठी ते पाणी भांडुप जलशुद्धीकरण केंद्रात वळवून ते पिण्यासाठी वापरण्याचा पर्याय निवडला आहे. यासाठी कंत्राटदाराचीही निवड केली असून तीन वर्षांत पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये खर्च येणार आहे. मुंबई महापालिकेकडून पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले जात असताना त्याला यश मात्र कधी येणार, हे पाहावे लागणार आहे. अन्यथा भविष्यात मुंबईतही भीषण पाणीटंचाईचा धोका अटळ आहे.पाण्यासाठी विविध पर्याय अवलंबायला हवेत. मात्र त्याकडे साफ दुर्लक्षच केले जाते. एप्रिल आणि मेमध्ये पाण्याची काय परिस्थिती असू शकते, हे आपल्याला लक्षात येते. त्यामुळे आधीपासूनच पाणी बचतीचे संदेश द्यायला हवेत; पण तसे होत नाही. पाणी वापराचे नियोजन कुठेच होत नाही. रहिवासी संकुले, मोठ्या हॉटेलांतील स्विमिंग पूल, वॉटर स्पोर्टर्स तसेच अन्य ठिकाणचा पाण्याचा चंगळवादी वापर याकाळात थांबायला हवा. शिवाय पाणीचोरी, पाणीगळती रोखली तर २५ ते ३० टक्के वाया जाणारे पाणी आपल्याला उपलब्ध होईल.-प्रदीप पुरंदरे, जल अभ्यासक

# नेमके चुकतेय कोणाचे?




शहरात गेल्या आठवड्यात पूर्वमोसमी किंवा वळवाचा पाऊस झाला आणि अनेक नव्या ठिकाणी पाणी साचले, काही ठिकाणी ते नागरिकांच्या घरातही शिरले. पुणे महानगरपालिकेने नेहमीप्रमाणे नालेसफाईपासून पावसाळापूर्व कामे पूर्ण केल्याचा दावा केला आहे. ही कामे पूर्ण झाली असती, तर शहरावर ही परिस्थिती उद्भवली नसती. मग, नेमके चुकतेय कोणाचे? यंत्रणांचे की पावसाचे?

पुण्यात काही वर्षांपूर्वी पावसाळी हंगामातील जून-जुलै या दोन महिन्यांतच जोराचा पाऊस झाला. पावसाचे सातत्य टिकून असल्याने शहरभर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले. या खड्ड्यातून वाट काढता काढता नागरिकांच्या नाकीनऊ आले. त्या रागातून पुणेकरांनी महापालिकेची सत्ता वेगळ्या पक्षाच्या हातात सोपवली. त्यानंतर, त्या पक्षाकडून अपेक्षित कामे झाली नाहीत; त्यामुळे गेल्या निवडणुकीत एकाच पक्षाला पूर्ण बहुमताची सत्ता दिली. किमान, दर वर्षी जाणवणाऱ्या समस्या तरी दूर होतील, अशी एक भाबडी अपेक्षा पुणेकरांनी ठेवली, त्यात त्यांची तरी काय चूक? महापालिकेवर गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ कोणत्याच पक्षाची सत्ता नाही. 'हा माझा, तो माझ्या जवळचा' असे सांगणारे नगरसेवक नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून नागरिकांची कामे होतील, ही आशा पूर्ण धुळीस मिळाली आहे. लोकप्रतिनिधी असोत, प्रशासकीय राजवट असो किंवा कोणी असो-नसो; पुण्यातील नागरिकांच्या मूलभूत गरजा किंवा अपेक्षांची पूर्तता होणे, हे कधीही पूर्ण न होणारे स्वप्न आहे, असेच म्हणायला हवे.

शहरात एखाद्या जलवाहिनीसाठी किंवा मैलापाणी वाहिनीसाठी रस्त्याचे खोदकाम झाले, तर तो दुरुस्त करताना 'इंडियन रोड काँग्रेस'च्या निकषांनुसार काही पथ्ये पाळावी, हा नियम सांगतो. मात्र, महापालिकेतील वर्षानुवर्षे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुस्तकी नियमांपेक्षा स्वत:चे वेगळे नियम करण्याची सवय लागली आहे; त्यामुळे शहरात खोदलेला एकाही रस्त्याचे निकषांनुसार पुनर्डांबरीकरण केले जात नाही. बहुतांश रस्त्यांचा खोदलेल्या भागावर काँक्रिटची मलमपट्टी लावली जाते. डांबर आणि काँक्रिट एकमेकांना पूरक नाहीत, हे 'इंजिनीअर' पदवी घेऊन महापालिकेत काम करणाऱ्या सर्वांनाच माहिती आहे, तरीही 'हीच आमची दुरुस्ती' असे सर्रास सांगितले जाते. मग, पालिकेतील अधिकाऱ्यांना आता तात्पुरती दुरुस्ती केली आहे, पावसाळा संपला की व्यवस्थित करू अशा कारणापासून ते पुन्हा तिथे काम करावे लागणार असल्याने परत पूर्ण डांबरीकरण केलेले नाही, यापर्यंत कोणतीही कारणे सापडतात. खोदलेल्या रस्त्याची पातळी (रोड लेव्हल) तर कधीच आधीच्या रस्त्याच्या सम पातळीवर येत नाही. त्यामुळे पावसाळ्यात कोणत्या तरी एका बाजूला अधिक पाणी साठते. 'शास्त्र असतं ते!' हे आपल्यालाही समजत असेल, तर महापालिकेत अनेक वर्षे काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नागरिकांना चांगले रस्ते द्यावेत, असे का वाटत नाही?पावसाळापूर्व होणारी नालेसफाई, हा तर केवळ आतबट्ट्याच्या व्यवहार आहे. माध्यमांना माहिती देताना 'एवढ्या किमीचे नाले', 'एवढी स्वच्छता झाली', 'एवढा गाळ काढला' असे आकड्यांवर आकडे दिले जातात. वस्तुस्थिती काय आहे, हे नाल्याच्या आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांना चांगलेच माहीत असते. एखादा भलामोठा पाऊस झाला, की नाल्यांच्या स्वच्छतेचे कसे तीन-तेरा वाजतात, याचा चांगलाच अनुभव आंबिल ओढ्यालगत राहणाऱ्या सर्वच नागरिकांनी पाच वर्षांपूर्वी (२०१९) घेतला आहे. कागदपत्रांपासून, घर-मालमत्ता आणि वाहनांपर्यंत एका रात्रीत 'होत्याचे नव्हते' झाले, तरीही या नालेसफाईबाबत ठोस कारवाई कधी झाल्याचे पाहायला मिळाले नाही. नालेसफाईसाठी यंत्रे आणि मनुष्यबळ काम करीत असल्याचा 'देखावा' कायमच निर्माण केला जातो. दर वर्षी पावसाळ्यामध्ये नाले तुंबतात आणि पाण्याचा प्रवाह नाल्यांची हद्द सोडून आजूबाजूला पसरतो, याचे कारण नक्की काय असेल, याचा अभ्यास पालिकेतील अनेक हुशार अधिकाऱ्यांना का करावासा वाटत नसेल? की काही वेगळ्याच गोष्टींचा अधिक अभ्यास केला जातो अन् या अभ्यासात कधी लोकप्रतिनिधींना बरोबर घेतले जात असल्याने प्रत्यक्ष कागदावरचा अभ्यास आणि प्रत्यक्षातील परिस्थिती, यात तफावत राहते, हे आता सर्वसामान्यांना समजू लागले आहे. महापालिकेच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये समन्वय नसल्याची अनेक उदाहरणे कायमच पुण्यातील नागरिकांनी पाहिली आहेत. म्हणजे, नवा रस्ता केला, की दोन-तीन दिवसांनी येऊन पाणीपुरवठा किंवा मैलापाणी वाहिन्यांसाठी तो खणला जाणार... पदपथाची पुनर्रचना करून तो सुशोभित केला, की त्यावर पुन्हा जिमची साधने बसविण्यासाठी कुठे तरी खोदकाम होणार.. अशा कित्येक गोष्टी नागरिक रोज पाहतात. कधीतरी त्यावर सोशल मीडियावरून आवाज उठवितात; पण रस्त्यावरील काम सदोष पद्धतीने होत असल्याबाबत ना महापालिकेतील अधिकाऱ्यांना खेद, ना लोकप्रतिनिधींना खंत. महापालिकेच्या विभागांमध्ये परस्पर समन्वय नसेल, तर इतर विभागांशी तो कसा राहील? त्यामुळे शहरात काम करणाऱ्या सर्वच यंत्रणा आपल्याला पाहिजे त्या पद्धतीने काम करत राहतात. महापालिकेच्या रस्ते आणि पदपथांवर मेट्रोचे जिने आणि लिफ्टचे बांधकाम करणाऱ्या महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) किंवा इतर तत्सम यंत्रणांना महापालिकेची परवानगी घ्यावी, त्यांचा सल्ला घ्यावा असे वाटत नाही. 'आम्ही केंद्रीय यंत्रणा आहोत, महापालिका स्थानिक यंत्रणा आहे,' असा काहींचा आविर्भाव असल्याने पावसाळी गटारे बुजवण्यापासून ते जिना-लिफ्टसाठी खांबांची जागा निश्चित करण्यापर्यंत या यंत्रणाच एकमेकांवर दोषारोप करीत राहतात. कधी एक यंत्रणा दुसऱ्या यंत्रणेला पत्र पाठवून चूक झाल्याने सुधारा, असा सल्ला देते. तर कधी दुसरी यंत्रणा तुम्हांला पूर्वकल्पना देऊनही तुमचे अधिकारी जागेवर आले नसल्याने मूळ आराखड्यानुसार काम केल्याचा दावा करत राहते; परंतु एकमेकांमध्ये संवाद साधून नागरिकांची अडचण होणार नाही, याकडे कोणाचे लक्ष नाही. त्यामुळे मेट्रो स्टेशनजवळ पालिकेच्या पदपथाची तोडफोड करून मेट्रोचे तिथे सर्व काम झाल्यानंतर पावसाळ्यातील पाणी जाण्यासाठी वाटच करून दिली नसल्याचे निदर्शनास येते.अशा अनेक गोष्टी एकापाठोपाठ समोर येतात आणि मग प्रश्न पडतो. सर्वच यंत्रणांसाठी काम करणारी तुमच्या-आमच्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातीलच आहेत. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना रस्त्यावर साचणाऱ्या पाण्यातून जाताना किंवा जागोजागी पडलेल्या खड्ड्यांतून वाट काढताना काहीतरी त्रास तर होत असेलच ना. मग, संबंधित यंत्रणांमध्ये काम करणाऱ्या आणि अधिकारीपदावर निर्णय घेण्याची जबाबदारी असणाऱ्यांतकडे ते गाऱ्हाणे मांडतात का? आणि मांडत असतील तर त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन ऐकण्याची आणि सुधारणा करण्याची यंत्रणांमध्ये काम करणाऱ्यांची खरीच इच्छा आहे का? की या सर्वांसाठी मनुष्यापेक्षा त्यांना हलविणारी काही इतर धनयंत्रे अधिक मोलाची झाली आहेत. आगामी पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचले, गाड्या बंद पडल्या, नागरिकांची गैरसोय झाली, तर 'कमी वेळात जास्त पाऊस पडला' हे ठरावीक साच्यातील उत्तर ऐकायला आले, तर दुर्दैवाने यंत्रणांमधील सर्वांची मनयंत्रे नाही, तर धनयंत्रे अधिक कार्यक्षम आहेत, हेच खरे समजावे लागेल.

# 'टर्ब्युलन्स' म्हणजे काय?



नुकताच एका विमानात 'टर्ब्युलन्स', म्हणजे हवामान अचानक बिघडल्याने अपघात झाला. अनेक प्रवासी जखमी झाले आणि एकाचा मृत्यूदेखील झाला. गेली ४४ वर्षे मी वैमानिक म्हणून काम करीत आहे. आधी हवाईदलात आणि आता एका विमान वाहक कंपनीत. माझ्या अनुभवावरून हा विषय सोप्या भाषेत समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो.विमानचालन उद्योगात वापरला जाणाऱ्या 'टर्ब्युलन्स' या इंग्रजी शब्दाला योग्य प्रतिशब्द मराठीत नाही. ढोबळपणे त्याला अशांतता, गोंधळ किंवा प्रक्षुब्धता म्हणता येईल. या लेखापुरते आपण 'टर्ब्युलन्स'ला वातावरणात माजलेली खळबळ, असे म्हणू. वातावरणात खळबळ नक्की का होते? वाऱ्याचा वेग किंवा दिशा बदलली, की खळबळ होते. संथ वाहणारी खोल नदी आणि उथळ ठिकाणी दगड-धोंड्यांमुळे खळखळत उसळत असलेले फेसाळ पाणी यांच्यातला फरक डोळ्याला दिसतो. तेच हवेत झाल्यास सहज दिसून येत नाही. वारा त्याच्या वेगामुळे जाणवतो. बंद गाडी किंवा विमानात बसले असताना वारा जाणवत नाही.

**वाऱ्याचा वेग किंवा दिशा का बदलते?**

पृथ्वीच्या स्वत:भोवती फिरण्यामुळे वातावरणात नेहमीच वारे वाहत असतात. त्यांचा अभ्यास केल्यावर, दिशा आणि वेग नक्की समजले; तेव्हा त्या वाऱ्याचा उपयोग नौकानयन करण्यासाठी शिडे वापरणाऱ्या जहाजांनी केला. त्यांना व्यापारी वारे म्हणूनच म्हणतात. पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या उत्तरेला आणि दक्षिणेला वाहणाऱ्या वाऱ्याची दिशा वेगळी असते. भिन्न दिशेने येणारे वाऱ्याचे प्रचंड प्रवाह एकमेकांवर आदळले, की हवेत खळबळ होते. स्थानिक तापमान वाढले किंवा कमी झाल्यास वातावरणाचा दाब कमी-जास्त होतो. वारे उच्च दाबाकडून कमी दाबाकडे आणि तापलेल्या जमिनीपासून आकाशाकडे वाहू लागतात. यामुळे हवेतली खळबळ अजूनच वाढते. वातावरणात पुरेशी आर्द्रता असते, तेव्हा ढग तयार होतात. व्यावसायिक प्रवासी विमानांमध्ये प्रवाशांची काळजी घेण्यासाठी आणि प्रवास सुखकर होण्यासाठी, आम्ही खळबळी हवा असलेले परिसर टाळतो. त्यासाठी उड्डाण करण्यापूर्वी आणि उड्डाणाच्या दरम्यान आम्हाला अचूक व ताजे हवामान अंदाज वारंवार दिले जातात.

**छुपी खळबळ**

ढग दिवसा डोळ्याला दिसतात आणि चमकणाऱ्या विजा रात्री दिसतात. मोठ्या ढगांजवळ खळबळी वारे नक्कीच असते, म्हणून आम्ही अशा ढगांजवळ जाणे टाळतो. त्यासाठी विमानात हवामान रडार असतात. ते आम्हाला रात्रीही ढग दाखवतात. मग आम्ही ठरलेला मार्ग सोडून, ढगांच्या बाजूने पुरेसे अंतर ठेवून पुढे जात राहतो. त्यासाठी इंधन आणि वेळ जास्त खर्च होतो; पण प्रवाशांना आराम मिळावा, म्हणून आम्ही ते करतो. खळबळी वाऱ्याचा आणखी एक प्रकार आहे; त्याला 'क्लिअर एअर टर्ब्युलन्स' (कॅट) म्हणतात. याचा अर्थ आहे, निरभ्र हवेतली खळबळ. ती डोळ्याला दिसत नाही, हवामान रडारवरदेखील स्पष्ट कळत नाही. ही छुपी खळबळ साहजिकच धोकादायक असते. नुकताच झालेला अपघात यामुळेच झाला असावा, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, ते विमान तब्बल तासभर खळबळी वाऱ्यामध्ये अडकले होते. त्यामध्येच एके ठिकाणी वाऱ्याच्या वर-खाली होणाऱ्या आणि न दिसणाऱ्या हालचालीमुळे ३७ हजार फुटांवर चाललेले विमान अचानक चारशे फूट वर गेले आणि लगेचच चारशे फूट खाली कोसळले. काही क्षणांत घडलेल्या या तीव्र हालचालीमुळे हा अपघात झाला.

**असे का घडले असावे?**

ही घटना समजून घेण्यासाठी नदीच्या पात्रात दिसणारे भोवरे डोळ्यासमोर आणा. जत्रेत मोठ्या चक्रीत बसण्याचा अनुभव घेतला असेल, तर खाली येतानाच्या वजनहीनतेची कल्पना असेलच. त्याचप्रमाणे, विमान अचानक खाली येते, तेव्हा प्रवाशांसह सर्व मोकळ्या वस्तू वर फेकल्या जातात. सिंगापूर एरलाइन्सच्या विमनात असेच घडले. मोठ्या चक्रीत बसण्याचा अनुभव नसेल, तर गतिरोधकावरून किंवा रस्त्यावरील खड्ड्यांवरून वेगाने निघालेल्या एसटीच्या प्रवासाची आठवण करा. तो अनुभव शंभर पटीने वाढवल्यावर काय परिस्थिती होईल, याची कल्पना करा.

**हे टाळले असते का?**

माझ्या मते ते शक्य नव्हते; कारण निरभ्र हवेतली खळबळ (कॅट) हे एक छुपे संकट आहे. प्रवासी आणि विमानाला कसलाही त्रास व धोका होऊ नये, म्हणून आम्ही नेहमीच काळजी घेतो; त्यामुळे कोणीही वैमानिक दिसत असलेल्या किंवा अनुमानित खळबळी वाऱ्याच्या ठिकाणी जाणूनबुजून जाणार नाही, हे मी खात्रीने सांगू शकतो. सांख्यिकीयदृष्ट्या हवाई प्रवास हे वाहतुकीचे सर्वांत सुरक्षित साधन आहे; परंतु वेग जास्त असल्याने क्वचितच जे अपघात घडतात, त्यात दुखापती मोठ्या होतात, म्हणूनच प्रसिद्धी मोठ्या प्रमाणावर होते.

**काय काळजी घ्यावी?**

विमान प्रवासात तीन गोष्टी काटेकोरपणे पाळाव्यात.

१. बसलेले असताना नेहमीच आसन पट्टा बांधलेला असावा. निष्कारण उभे राहणे किंवा चालणे टाळावे.

२. विमानात असताना परिचारकांनी (केबिन क्रू) दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करावे. ते फक्त आपल्याला खाद्यपदार्थ देण्यासाठीच नसतात, तर त्यांचे मुख्य काम आपली सुरक्षितता सुनिश्चित करणे हे आहे. आपण सहकार्य केल्याशिवाय ते त्यांचे काम करू शकत नाहीत. त्याचप्रमाणे वैमानिकांनी केलेल्या सूचनाही आवर्जून ऐकल्या पाहिजेत.

३. सहकार्य करण्यासाठी, आपण आधी त्यांच्या सूचनांकडे लक्ष दिले पाहिजे.

मी साधारणतः कॉकपिटमध्ये असतो; पण प्रवासी केबिनमध्ये बसण्याची संधी मिळते, तेव्हा मी सुरक्षा सूचना चालू असताना प्रवाशांचे निरीक्षण करतो. जवळजवळ सगळे प्रवासी त्या सूचनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत असतात. भारतीय प्रवासी परदेशी लोकांच्या मानाने जास्त अधीर आणि मागणी करणारे असतात, असे माझे परिचारक मित्र सांगतात. एका मित्राच्या मते, विमानाचे तिकीट घेतल्यावर अगदी विमान कंपनी विकत घेतल्यासारखे बरेच जण वागतात.एकदा मी प्रवासी म्हणून माझ्या वैमानिकाच्या गणवेशात जात असताना, माझ्या शेजारी बसलेला माणूस आमचे विमान टेक ऑफ करण्यासाठी धावपट्टीकडे जात असताना, सारखा फोनवर बोलत होता. मी रोखून पाहिल्यावर त्याने माझी नजर चुकवत, एकामागे एक कॉल करणे चालू ठेवले. आसपासचे सगळे प्रवासी त्याच्याकडे आश्चर्याने बघत होते. एक परिचारिका त्याला दटावून गेली; पण हा पठ्ठ्या कोणाचे ऐकायला तयार नव्हता.शेवटी टेक ऑफच्या वेळी मी त्याला म्हणालो, 'भाईसाहब, अब बंद भी करो, वरना...' माझा गणवेश आणि भाईसाहब हा शब्द मी 'भ'ने सुरू होणाऱ्या अनेक अपशब्दांच्या ठसक्यात वापरल्यामुळे तो महाभाग वरमला आणि फोन बंद करून लगेच झोपी गेला. प्रवासभर तो उघडे तोंड ठेवून मोठ्याने घोरत होता. नशीब त्याचे, की त्याच दिवशी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे विमानाचे लँडिंग जरा खराब झाले आणि कोणी तरी किंचाळले. ते ऐकून माझा शेजारी खडबडून जागा झाला आणि माझा हात घट्ट पकडून 'बचाओ, बचाओ...' असे ओरडू लागला. त्याला बघून इतर प्रवाशांत हशा पिकला!थोडक्यात सांगायचे म्हणजे, बसून राहा, वैमानिक व परिचारकांच्या सूचनांचे पालन करा. क्वचित प्रसंगी काही घडले, तर तेच आपल्याला सुरक्षित ठेवणार आहेत.

# शिवसेनेचा नाथ चषक सिताई क्लबच्या नावे तर सागर इलेव्हन संघ ठरला उपविजेता

## बीडमध्ये दरवर्षी नाथ चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करणार-सचिन मुळूक

**बीड (प्रतिनिधी):** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पुढाकारातून आयोजित नाथ चषक बीड प्रीमियर लीग' मध्ये बीडच्या सिताई क्लब संघाने धडाकेबाज फलंदाजी करत प्रतिष्ठेचा समजला जाणारा नाथ चषक जिंकत विजेतेपद पटकावले तर सागर एलेवेन संघाने उपविजेतेपद पटकावले. बक्षीस वितरण कार्यक्रमात शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दरवर्षी बीडमध्ये नाथ चषक प्रीमियर लीग चे आयोजन करणार असल्याचे सांगितले.





शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने बीडमध्ये प्रथमच नाथ चषक बीड प्रीमियर लीग या भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले होते. शिवजयंती दिनी १९ फेब्रुवारी रोजी सीपी मैदान पालवन चौक येथे स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर आदी उपस्थित होते. १९ ते २७ फेब्रुवारी दरम्यान सी पी मैदान येथे झालेल्या नाथ चषक प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेला बीड शहर व तालुका भरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नाथ चषक बीड प्रीमियर लीग २०२५ चा अंतिम सामना बीडच्या सिताई क्लब व सागर इलेव्हन मध्ये झाला. प्रथम फलंदाजी करत सागर एलेवेन संघाने सात षटकात ७६ धावा केल्या. अटीतटीच्या झालेल्या सामन्यात सिताई क्लबला जिंकण्यासाठी एका चेंडूत सहा धावा काढायच्या होत्या. परंतु जबरदस्त क्षेत्ररक्षण केल्याने सागर इलेव्हन ने सामना जिंकल्याचा जमा होता. हा सामना हातातून निसटत असताना सिताई क्लबच्या फलंदाजाने शेवटच्या बॉलवर षटकार मारून प्रतिष्ठेचा असणारा नाथ चषक जिंकत विजेतपद पटकावले. तर सागर इलेव्हन संघाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. द्वारकाधीश क्रिकेट क्लब ने तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस तर मॉर्निंग क्रिकेट क्लब ने चौथ्या क्रमांकाचे बक्षीस मिळविले. सीपी मैदान येथे २७ फेब्रुवारी रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांच्या उपस्थितीत विजेत्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने प्रथम पारितोषिक ५१ हजार व नाथ चषक, द्वितीय पारितोषिक ३१ हजार व चषक, तृतीय पारितोषिक ११००० व चषक, चौथे पारितोषिक ११००० व चषक देऊन संघांचा सन्मान करण्यात आला.

अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा नाथ चषक प्रीमियम लीग च्या यशस्वी आयोजनामध्ये विवेक मोटे, अविनाश लंगडे, नवनाथ ढोले, संदीप काळे, संजय कुलथे, सुरेश राठोड, रंजीत काकडे, संतोष कुराडे, खदीर भाई, निलेश शेठ व संपूर्ण सीपी क्रिकेट क्लब चा समावेश होता. सदर स्पर्धा क्रीडा प्रेमींसाठी युट्युबच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दहा दिवस बीड शहरातील व तालुक्यातील क्रिकेट प्रेमींसाठी या स्पर्धा पर्वणी ठरली असल्याने यापुढेही दरवर्षी नाथ चषक बीड प्रीमियर लीगचे आयोजन करू असे शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

# रांजणगाव गणपतीच्या विकासा साठी ६९ कोटींचा निधी मंजूर

**शिरूर । प्रतिनिधी**

राज्य सरकारने रांजणगाव गणपती आणि परिसराच्या पायाभूत सुविधांसाठी मोठा आर्थिक हातभार लावत पाणीपुरवठा योजनेसाठी ६३ कोटी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी ६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा निधी उपलब्ध झाला आहे.




रांजणगाव गणपती हे तीर्थक्षेत्र आणि औद्योगिक हब असल्याने येथे वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. तसेच, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती आणि स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.या निधीच्या मंजुरीसाठी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, तसेच विविध वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि उद्योजक उपस्थित होते.बैठकीत रांजणगाव, कारेगाव आणि ढोकसावंगी ग्रामपंचायतींसाठी चखऊ मार्फत विकासकामे हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, उद्योजकांकडून सामाजिक दायित्व निधी (उडठ) उभारण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले.या निधीमुळे रांजणगाव व परिसरातील नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि नागरी सुविधांमध्ये सुधारणा अनुभवता येणार आहे. औद्योगिक वाढ आणि तीर्थक्षेत्र म्हणून रांजणगाव गणपतीच्या महत्त्वाचा विचार करता हा निधी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

# जयंत पाटलांचे प्रश्न मार्गी लावणार-चंद्रशेखर बावनकुळे

## मी त्यांच्या राजकीय भविष्याबाबत बोलण्याइतका मोठा नाही

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यानंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले. पण जयंत पाटील यांचा राजकीय भविष्याबाबत बोलण्याइतका मोठा माणूस नाही, पण त्यांचे प्रश्न मार्गी लावणार असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, जयंत पाटील हे माझी वेळ घेऊन भेटायला आले होते. तिथे ४०० ते ५०० लोकं उपस्थित होती. आमच्यात कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही. केवळ विकास कामांसंदर्भात चर्चा झाली.



महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, जयंत पाटील यांनी त्यांच्या सांगली जिल्ह्यातील विकासकामांबाबत चर्चा केली. मी त्यांना आश्वासन दिले आहे की, येणाऱ्या अधिवेशनात त्यांच्या समस्यांच्या संदर्भात एक बैठक माझ्या दालनात लावणार आहे. जयंत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. ते त्यांच्या मतदारसंघाचे प्रश्न घेऊन भेटायला आले होते. यावेळी विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली. जयंत पाटील यांनी सर्व विषय माझ्यासमोर मांडले. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे त्यावेळी माझ्यासोबत होते.जयंत पाटील म्हणाले की, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत माझी २५ मिनिटे चर्चा झाली, पण भेटीत राजकीय हेतू नव्हता असे स्पष्टीकरण राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नांदेड येथे सांगितले. मी सांगली येथील महसूलच्याप्रश्नाबाबत भेट घेतली. या वेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे देखील होते. पण, ही भेट राजकीय नव्हती. विधानसभा सदस्य म्हणून एखाद्या मंत्र्याला त्यांच्या विभागाच्या कामासंदर्भात भेटणे हे काही गैर नाही. तरीही प्रसारमाध्यमे अशा प्रकारच्या बातम्या बनवितात हे खेदजनक आहेत, असे जयंत पाटील यांनी म्हटले होते.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मी अनेकदा दिल्लीतील मंत्र्यांना भेटत असते त्यांचे फोटो सोशल मिडीयावर पोस्ट करत असते. यात काही गैर नाही. विकास कामासंदर्भात मंत्र्यांच्या भेटी घ्याव्याच लागतात.

# नीलम गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढले:त्या काहीही खोटे बोलल्या नाहीत, एकनाथ शिंदेंकडून पाठराखण

**मुंबई (वृत्तसंस्था)**–दिल्ली येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या एका चर्चा सत्रात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी ठाकरे गटावर तसेच उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळते, असे विधान त्यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर ठाकरे गटातील नेत्यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर टीकेची झोड उठवली. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नीलम गोऱ्हे यांची पाठराखण केली आहे.

अंधेरी येथील जाहीर सभेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, नीलम गोऱ्हे हे दिल्लीच्या व्यासपीठांवरुन एक वाक्य बोलल्या आता ते व्यासपीठ बरोबर होते की चुकीचे होते हा भाग वेगळा. परंतु ते काही जणांना एवढे झोंबले की मिरच्या लागल्या. हा एकनाथ शिंदे त्यांना पुरुन उरला होता. गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढले, त्यामुळे त्यांना मिरची लागली. नीलम गोऱ्हेंच्या आधीही अनेक लोक हे बोलले आहेत.



पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, ना खोके नाही कंटेनर लागतात, असे राज ठाकरे बोलले होते. नारायण राणे, रामदास कदम, नितेश राणे असे अनेकजण बोललेत. हे काही नवीन नाही. पण नीलम ताई बोलल्यानंतर त्यांच्या मागे इतके लागले, त्यांना इतक्या मिरच्या लागल्या, पण नीलम ताईंवर इतक्या खालच्या दर्जावर जाऊन बोलणे, आरोप करणे त्यांना शोभत नाही. त्या खरे बोलल्या. काहीही खोटे बोलल्या नाहीत. आम्ही देना बँक आहोत आणि समोर लेना बँक आहेत, म्हणून ते जे बोलल्या ते कटू सत्य आहे.नीलम गोऱ्हे या महिलांवर अत्याचार झाला किंवा इतर काहीही झाले तर त्या पहिल्या धावून जायच्या, तेव्हा नीलम ताई चांगल्या होत्या. आताही शक्ती विधेयकात त्यांचे मोठे योगदान आहे. महिला सक्षमीकरणासाठी त्या काम करतात. हीच पोट दुःखी आहे. ती पोट:दुखी थांबत नाही, कारण ते डॉक्टरकडून औषध घेत नाहीत, कंपांऊडरकडून औषध घेतात, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे.

## पुण्यात शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार

# वर्दळीच्या स्वारगेट बसस्टँडवर पहाटे घडली संतापजनक घटना

**पुणे (वृत्तसंस्था)**–पुण्यातील स्वारगेट बसस्टँड परिसरात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. मंगळवारी पहाटे ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. ती आज दुपारी समोर आली. या घटनेमुळे पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजली आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, पीडित तरुणी पुण्याहून फलटणला जात होती. ती मंगळवारी पहाटे स्वारगेट बसस्थानकावर थांबली होती. तेव्हा एका अनोळखी व्यक्तीने तिची बस दुसऱ्या ठिकाणी थांबल्याचे सांगितले. पण तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. त्यावर तरुणीने तिच्या एकटेपणाचा फायदा घेत तिला विश्वासात घेतले. त्यानंतर तो तिला जवळच उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये नेले. तिथे त्याने तिच्यावर पाशवी बलात्कार केला व तेथून पळ काढला.

या घटनेमुळे हादरलेल्या तरुणीने आपल्या मित्राला फोनवरून ही घटना सांगितली. त्यानंतर मित्राने तिला तत्काळ पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला. तद्नुसार तरुणीने स्वारगेट पोलिस ठाणे गाठून आपबिती कथन केली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करत घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला. या घटनेची वाच्यता होताच पुण्यात एकच खळबळ माजली.

# माऊली दादांनी महाराष्ट्राला नम्रतेची शिकवण दिली लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे प्रतिपादन

**बीड (प्रतिनिधी):** महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र चाकरवाडी मध्ये महाशिवरात्रीनिमित्त अखिल भारतीय वारकरी संमेलन तसेच दोन दिवसीय महोत्सव सुरू आहे.प्रमुख मार्गदर्शक तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री ह.भ. प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्री महोत्सव निमीत्त होणारे सर्व कार्यक्रम पार पडतील. या महोत्सवामध्ये विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये महाशिवरात्री महोत्सवानिमित्त पहिल्या दिवशी वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेतील एक थोर विभूती मठाधिपती महंत श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र निनगुर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. ह. भ. प लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या गाथा मधील **अभंगावर चिंतन केलेत. तुम्ही विश्वनाथ**



**। दीनरंक मी अनाथ ।।१।।**
**कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ।।ध्रु.।।**
**काय उणें तुम्हांपाशीं। मी तों अल्प चि संतोषी ।।२।।**
**तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ।।३।।**

हे देवा तुम्ही विश्वनाथ आहात आणि मी तर दिन रंक अनाथ आहे. हे विश्वनाथ मी तुमचा भक्त आहे तुम्ही थोडी का होईना पण माझ्यावर दया करा. देवा तुमच्याजवळ भक्तांना देण्यासाठी काय उणे आहे आणि मी तर अल्प संतोषी आहे. तुकाराम महाराज म्हणतात हे देवा मला तुम्ही काहीतरी प्रेमरूपी भातुके म्हणजे खाऊ पाठवा. महाराजांनी आपल्या कीर्तन श्रावणेतून भाविकांना मंत्रमुग्ध केले. अशाप्रकारे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना संदेश दिला. अभंगावर चिंतन करून हरिहराचे दर्शन करून नाथाचे प्रकार कोणते आहे ? कृपेचे प्रकार किती ? अति महत्त्वाकांक्षामुळे भस्मासुराचा भस्म कसा झाला... महाशिवरात्री व शिव-पर्वामुळे चंड भिल्लाचा उद्धार कसा झाला. बोलताना महाराजांनी माऊली दादांनी महाराष्ट्राला नम्रतेची शिकवण दिली अशा प्रकारचे प्रतिपादन सुद्धा केले. माऊली दादा एक शिवाचे अवतार आहेत. माऊली दादा आणि सुदाम देव बाबा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यावेळी मृदुंगाचार्य नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेचे राम महाराज काजळे, अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे, गायनाचार्य श्रीहरीभाऊ महाराज काळे, गायनाचार्य महादेव महाराज रोडे, त्रिंबक महाराज शेळके, अमोल महाराज पवार, दिनेश महाराज काळे, राम महाराज गायकवाड, पांडुरंग महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज खोसे, तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त नादब्रम्ह वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी उपस्थीत होते.

# ऍपा क्रिकेट चॅम्पियन्स चषक स्पर्धा - २०२५
# वैद्यनाथ संघ विजेता तर सनरायजर्स संघ उपविजेता

## डॉ.राजेश इंगोले ठरले 'द मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेअर' तर डॉ.प्रदीप सोनवणे 'मालिकावीर' पुरस्काराने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत वैद्यनाथ संघास विजेतेपद तर सनरायझर्स संघास उपविजेतेपद मिळाले. दोन्ही तुल्यबळ संघात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात वैद्यनाथ संघाने अखेर बाजी मारली. साखळी सामन्यांमध्ये सलग चार विजयांचा धडाका लावत सनरायझर्स संघाने अंतिम फेरीत दिमाखदार प्रवेश केला होता. त्यांचा विजयाचा वारू अंतिम फेरीमध्ये मात्र वैद्यनाथ इलेव्हन संघाने आडवत त्यांना मात दिली. अंतिम सामन्यामध्ये वैद्यनाथ इलेव्हन संघाने सनरायझर्स संघाला दहा षटकांत विजयासाठी एकशे सोळा धावांचे लक्ष दिले. परंतु, सनरायझर्स संघाला केवळ शंभर धावा करता आल्या. कर्णधार प्रदीप सोनवणे यांच्या ३२ चेंडूतील तडाखेबंद ७० धावांमुळे वैद्यनाथ संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारण्यात यश आले डॉ.प्रदीप सोनवणे यांना स्पर्धेतील मालिकावीर आणि अंतिम सामन्यातील सामनावीर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




स्पर्धेमध्ये सनरायझर्स संघाला आपल्या दमदार फलंदाजी आणि गोलंदाजीने अंतिम फेरीपर्यंत नेलेल्या डॉ.राजेश इंगोले यांना अंतिम फेरीत मात्र आपल्या संघास विजय प्राप्त करून देण्यात अपयश आले. पाच पैकी चार सामन्यांमध्ये सामनावीराचा पुरस्कार पटकविणारे डॉ.राजेश इंगोले यांना स्पर्धेतील 'द मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेयर' या अत्यंत महत्त्वाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ.राजेश इंगोले यांनी पाच सामन्यात ६७ च्या सरासरीने २५० धावा तर गोलंदाजी करताना चार सामन्यांमध्ये सात बळी मिळवून अष्टपैलू कामगिरी केली त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. हा सामना पाहण्यासाठी अनेक डॉक्टर्स तसेच क्रिकेटप्रेमींनी मैदानावर गर्दी केली होती. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, संपादक बालाजी तोंडे, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सामन्यासाठी पंच म्हणून बिंबीसार वाघमारे व संघर्ष इंगळे, स्कोअरर म्हणून चाफा भडके व प्रा.अनंत कांबळे तर समालोचक म्हणून डॉ.देवराव चामनर, डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.संदीप जैन यांनी कामगिरी बजावली. या स्पर्धांच्या यशस्वितेसाठी ऍपाच्या कार्यतत्पर अध्यक्षा डॉ.सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ.सुनील नांदलगावकर, सचिव डॉ.ऋषिकेश घुले, क्रीडासचिव डॉ.बी.डी.माळवे, डॉ.नजीरूद्दीन, डॉ.विवेक मुळे यांनी परिश्रम घेतले. क्रीडासचिव डॉ.बी.डी.माळवे यांनी यावेळी अत्यंत कल्पकतेने डॉक्टर्सच्या क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले, त्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सहृदय सत्कार करण्यात आला. योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानात सुरू असलेल्या ह्या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व अनोख्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाल्या .

## चर्मकार समाजाच्या विविध मागण्यासाठी देविलाल बिरसोने यांचे मंत्री संजय सिरसाट यांना निवेदन

**जालना । असलम कुरेशी**

महाराष्ट्राच्या सर्व चर्मकार समाजाच्या विविध मागण्यासाठी अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष देविलाल बिरसोने यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांना निवेदन दिले.

यासंदर्भात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांना दिलेल्या निवेदनात देविलाल बिरसोने यांनी संत रोहिदास चर्म उद्योग आर्थीक विकास महामंडळचे बजेट वाढवण्यात यावे, पन्नास लाख रुपये पर्यंत कर्ज चर्मकार समाजाला महामंडळ मार्फत देण्यात यावे, संत रोहिदास पुरस्कार महाराष्ट्रामध्ये समाजाला वाढवुन देण्यात यावे, महाराष्ट्रातील चर्मकार समाजाला



सरसकट घरकुल देण्यात यावे, संत रोहिदास चर्मोउद्योग अर्थिक विकास महामंडळ अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदान दहा हजार वरुन एक लाख रुपये करण्यात यावे, महाराष्ट्रातील ज्या चर्मकार बांधवांनी स्टॉल घेतलेले आहेत त्यांचे स्टॉल खराब झालेले आहेत, सडलेले आहेत, त्यांना परत स्टॉल देण्यात यावे आदी मागण्या केल्या.

## श्रीगोंदयात अँटी करप्शनची कार्यवाही, पोलीस जाळ्यात

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

श्रीगोंदयात पोलिसच बनले भक्षक अशी अवस्था झाली असून सर्व सामन्यासाठी पोलीस म्हणजे आधार नसून त्यांची भीती वाटू लागली आहे गुन्हेगारांवर वचक नसणे हे रोजचेच झाले असताना आज चक्क पोलीस हवालदार संतोष फलके यांनी गुन्ह्यातील तपासात मदत करतो म्हणून वीस हजाराची लाच माघितली तडजोडी अंती सात हजाराची लाच सिकारताना रंगे हात पकडण्यात आले ही कार्यवाही श्री राजू आल्हाट पो निरीक्षक, श्री अजित त्रिपुटे पो उप अधीक्षक, राधा खेमनर, गजानन गायकवाड, दशरथ लाड यांनी श्रीमती शर्मिष्ठा घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.




**सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ संपर्क साधावा.**

**–अँन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर.**

## इकरा अपहरण प्रकरणाच्या उच्चस्तरीय तपासाची खा.डॉ कल्याण काळे यांची मागणी

### शिष्टमंडळाने दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । असलम कुरेशी**

अंबड शहरातील फैसलाबाद कॉलनी येथील ३ वर्षीय इकरा अमजद मनियार या मुलीच्या अपहरण प्रकरणाचा १२ जानेवारी २०२५ पासून शोध सुरू आहे. मात्र, ४६ दिवस उलटूनही तपासाला वेग आलेला नाही. त्यामुळे मुलीच्या कुटुंबीयांवर मोठा मानसिक ताण येत असून, पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेच्या उच्चस्तरीय तपासाची मागणी खा. डॉ. कल्याण काळे यांनी केली असून, त्यांच्यामार्फत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.



खा. डॉ. काळे यांच्यावतीने अंबड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याणराव तार्डे, अंबड शहराध्यक्ष जाकीरभाई डावरगावकर, माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, हाजी अब्दुल हमीद, माजी नगरसेवक सय्यद अझहर, युवक काँग्रेस जालना विधानसभा अध्यक्ष शेख वसीम, काँग्रेसचे जिल्हा सचिव लक्ष्मणराव बोंबले आणि रसूलभाई यांनी आज गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. त्यात म्हटले आहे की, अंबडमध्ये घडलेल्या या धक्कादायक घटनेला ४६ दिवस उलटूनही कोणतेही ठोस निष्कर्ष समोर आलेले नाहीत. अपहरणाच्या सुरुवातीच्या २४ तासांतच प्रभावी तपास होणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, शहरात असुरक्षिततेचे वातावरण आहे. या प्रकरणाचा तपास तातडीने जलदगतीने करण्यात यावा तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत काँग्रेस पक्ष तडजोड करणार नाही व या प्रकरणाचा तपास जलदगतीने व्हावा यासाठी लढा सुरूच राहील, असा निर्धार काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. अंबडमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या वातावरणामुळे नागरिकांमध्ये भीती आहे. पोलीस प्रशासनाने तात्काळ उच्चस्तरीय तपास करून सत्य समोर आणावे, जेणेकरून नागरिकांचा विश्वास प्रशासनावर पुन्हा बसू शकेल, असे खा. डॉ. कल्याण काळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## अंबाजोगाईतून जाणाऱ्या 'शक्तीपीठ' महामार्गाबाबत 'एमएसआरडीसी' ने घेतला महत्त्वाचा निर्णय




**अंबाजोगाई । परवेज पटेल**

राज्यभरातील १२ जिल्ह्यांमधून जाणाऱ्या नागपूर – गोवा 'शक्तीपीठ' महामार्गाला कोल्हापूरकरांचा मोठा विरोध होतोय. या महामार्गासाठी राज्यातील २७ हजार हेक्टर जमीन अधिग्रहित करण्याची योजना आहे.

मात्र, या विरोधाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आता कोल्हापुरातील प्रस्तावित सरेखन वळवून 'शक्तिपीठ' महामार्ग कोकणाकडे कसा नेता येईल, यासाठी मोठा निर्णय घेतलाय. 'शक्तीपीठ' महामार्गाला होणारा विरोध लक्षात घेऊन अखेर पर्यायी सरेखन करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आलाय. 'शक्तीपीठ' महामार्गाला असलेला विरोध मावळला नाही तरच पर्यायी महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ वापरणार असल्याचे सांगण्यात येतय.

'ही' देवस्थाने जोडली जाणार

केळझरचा गणपती, कळंबचा गणपती, सेवाग्राम, पोहरादेवी, माहूरगड शक्तीपीठ, तख्त सचखंड गुरुद्वारा, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, अंबाजोगाई शक्तिपीठ, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट, सांगलीतील औदुंबर दत्त मंदिर, नरसोबाची वाडी, जोतिबा देवस्थान, महालक्ष्मी मंदिर, संत बाळूमामा यांचे समाधिस्थान आदमापूर, कुणकेश्वर आणि पत्रादेवी ही देवस्थाने जोडली जाणार आहेत

## आरणगाव दुमाला येथील ऊस शेतकऱ्यांची लूट थांबणार कधी?

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

श्रीगोंदा तालुक्यातील ऊस शेतकऱ्यांची लूट थांबणार कधी सविस्तर वृत्त असे कि ऊस तोड ही अंतिम टप्यात आली असून वर्ष्यभर शेतकऱ्यांनी कष्टाने घेतलेले पिक हे कारखाना नेते नसल्याने शेतकरी चिंतेत आला असून याचाच फायदा ऊसतोड मुकादम व ऊसतोड मजूर घेत आहेत आधीच उसाला भाव नाही व कारखाना वेळेवर उसाचे पैसे देत नाही खताची महागाई, विजेचे संकट अश्या परिस्थिती शेतकरी वर्ष्यभर पिक वाढवतो त्यात भर कि काय आता ऊसतोड मुकादम व मंजूर शेतकऱ्यांची अडवणूक करून आर्थिक लूट करताना दिसत आहे ऊसतोडीचे हजारो रुपये शेतकऱ्यांकडे कोयत्या प्रमाणे माघीतले जातात नाही धिले तर ऊस तोड करत नाही अश्या एक नं अनेक पद्धतीने मुकादम आपली मनमानी करताना दिसत आहेत यांच्या मुसक्या कोण आवळणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष असणार आहे यातच अरणगाव दुमाला येथील मुकादम यांनी कोर्टात सुरु असलेल्या वादग्रस्त शेती मधून ऊस तोडून नेला यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी कायदेशीर मार्गाने मुकादमावर कार्यवाहीची मागणी केली असून इतर शेतकऱ्यांनी ही होणारी लूट थांबण्यासाठी कायदेशीर मार्गाने समंधित मुकादम व मंजूर यांची तक्रार कारखाना व इतर ठिकाणी करावी



**मुकादम हा ऊसतोड मजुरांच्या अडोश्याने शेतकऱ्यांची लूट करत आहे हे शेतकऱ्यांना समजतं आहे त्यांना सहकार्य करणारे साखर सम्राट यांना ही शेतकरी वेळ आल्यावर मतपेटितून आपला संताव व्यक्त करतील शेतकऱ्याची ताकत वेळेवर कळेलच**

**– शेतकरी**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077